




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. २० मार्च २०२६



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर

आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए

Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ११२ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# इराणला साथ न देणे ही भारताची मोठी चूक!

## शिवतीर्थावरून राज ठाकरेंचा मोदी सरकारला इशारा, म्हणाले - भविष्यात फटका बसणारच

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर शिवतीर्थावर मनसे प्रमुख राज ठाकरे यांची तोफ धडाडली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्थापनेला आज २० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आजचा मनसेचा गुढीपाडवा मेळावा खास आहे. आजच्या मेळव्यात बोलताना राज ठाकरे यांनी आपल्या खास शैलीत राज्यातील विकासाचा बोजवारा, नोकऱ्यांचा प्रश्न आणि वाहतूक कोंडीवरून सरकारला धारेवर धरलेच, पण त्याचबरोबर इराण-इस्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणावरही अत्यंत बोचरी टीका केली.

आंतरराष्ट्रीय घडामोडींवर भाष्य करताना राज ठाकरे म्हणाले की, "आज जगभरात भीषण परिस्थिती आहे. सध्या सगळीकडे धाकधूक आहे. भीषण परिस्थिती आहे. अन्न शिजवायला गॅस मिळत नाहीये. खरं तर काही गोष्टी आपल्याकडून राहून गेल्या. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून राहून गेल्या. इराण इतकी वर्षे आपल्याला साथ देत होता. त्या इराणवरती जे हल्ले होत आहेत, त्यामध्ये आपण इराणला साथ द्यायला हवी होती.

या देशामध्ये येणारे बरचसं तेल इराणहून येते. ते आपल्याला तेल रुपयात देतात. खामेनेई गेल्यानंतरही आपल्या




पंतप्रधानांनी कुठलेही निषेधाचे एकही निवेदन काढले नाही. हल्ल्यावरही कुठले निवेदन दिले नाही, इराणला पाठिंबा न देणे ही मोठी चूक असून, त्याचे गंभीर परिणाम भविष्यात देशाला भोगावे लागतील," अशी भीतीही राज ठाकरे यांनी व्यक्त केली.

राज्यातील शहरांच्या दुरवस्थेवर नाराजी व्यक्त करताना राज ठाकरे यांनी प्रशासकीय अनागोंदीवर निशाणा साधला. "आज शहरांना कोणताही आकार राहिलेला नाही. कोणालाही कुठेही इमारती बांधण्याची परवानगी दिली जात आहे. शहरांची अवस्था अत्यंत बकाल झाली असून रस्ते आणि वाहतूक कोंडीचा प्रश्न आवाक्याबाहेर गेला आहे," अशी टीका त्यांनी केली. राज ठाकरे म्हणाले, "मुख्यमंत्री सांगतायेत विकास करायचाय. तीन ट्रीलीयनची अर्थव्यवस्था करायची आहे. पण सध्या महाराष्ट्रावर 11 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. ज्यावेळी पृथ्वीराज चव्हाण राज्याचे मुख्यमंत्री होते तेव्हा राज्यावर 2 लाख कोटींचे कर्ज होते. 2014 ते 2026 या काळात हे सगळं 11 लाख कोटींचे कर्ज झाले आहे." आपल्या राजकीय प्रवासाचे २० वे वर्ष साजरे करताना राज ठाकरे यांनी शिवसेनाप्रमुख हिंदुहृदय बाळासाहेब ठाकरे यांच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, "मी ज्या वयात राजकारणात आलो, तेव्हा बाळासाहेबांनी मला एक गुरुमंत्र दिला होता. ते म्हणाले होते की, तू भाषण किती जोरात करतोस किंवा कसे करतोस यापेक्षा तू भाषणातून आज लोकांना काय दिले, हे महत्त्वाचे आहे." त्यांच्या या विधानाचा संदर्भ घेत राज ठाकरेंनी आपल्या कार्यकर्त्यांना भाषणापेक्षा कृती आणि आशयावर भर देण्याचे आवाहन केले.

### भीषण परिस्थितीचे वास्तव

देशातील आर्थिक स्थितीवर बोलताना त्यांनी सामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. "लोकांना अन्न शिजवायला गॅस मिळत नाहीये, सगळीकडे धाकधूक सुरू आहे. काही महत्त्वाच्या गोष्टी पंतप्रधानांकडून राहून गेल्या आहेत, ज्याचा फटका देशाला बसतोय," असेही ते म्हणाले.

### शाळा-कॉलेजमध्ये उघडपणे ड्रग्ज विक्री

राज्यातील वाढती गुन्हेगारी आणि शाळा आणि महाविद्यालयाबाहेर उघडपणे अमली पदार्थांची विक्री केली जात असल्याचे राज ठाकरेंनी संताप व्यक्त केला. राज ठाकरे यांनी इशारा दिला की, जर सरकारने या गंभीर प्रश्नांवर तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर येणारा काळ राज्यासाठी अधिक कठीण असेल. या सभेमुळे आगामी काळात सत्ताधारी आणि मनसे यांच्यातील राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

# अमेरिका व इस्रायलच्या युद्धखोरीविरोधात अहिल्यानगरमध्ये निदर्शने

■ डोनाल्ड ट्रम्प, बेंजामिन नेतान्याहू यांच्या निषेधाच्या घोषणा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मध्यपूर्वेत कोणत्याही ठोस कारणाशिवाय युद्ध लादल्याचा आरोप करत पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद या संघटनांच्या पुढाकाराने अमेरिका आणि इस्त्रायलविरोधात जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. शहरातील दिल्लीगेट भागात हे आंदोलन आज, गुरुवारी करण्यात आले. आंदोलकांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्त्रायल पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या प्रतिमांना जोडे मारून व त्या पायाखाली तुडवत संताप व्यक्त केला तसेच ट्रम्प व नेतन्याहू यांच्या निषेधाच्या घोषणा दिल्या. आंदोलनात ॲड. कारभारी गवळी,




अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, वीरबहाद्दूर प्रजापती, सचिन कुक्कडवाल, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, पोपट भोसले, धनंजय मडके, कैलास पठारे, अशोक भोसले यांच्यासह संघटनांचे पदाधिकारी सहभागी होते.

आंदोलनादरम्यान ॲड. कारभारी गवळी यांनी निषेध नोंदविताना सांगितले की, अमेरिका आणि इस्त्रायलच्या आक्रमक धोरणांमुळे जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. या युद्धाचे परिणाम केवळ मानवजातीपुरते मर्यादित राहणार नसून संपूर्ण सजीव सृष्टीवर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. विशेषतः तेलविहिरींवरील संभाव्य हल्ल्यांमुळे पर्यावरणीय संतुलन बिघडण्याचा धोका असून हवा व पाण्याचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढू शकते तसेच ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. जगातील सुज्ञ नागरिकांनी शांततेसाठी पुढाकार घ्यावा. अमेरिका आणि इस्त्रायलने विज्ञान-तंत्रज्ञानात मोठी प्रगती केली असली तरी मानवतावाद आणि सजीव सृष्टीबद्दलची संवेदनशीलता त्यांनी गमावली.

ॲड. अशोक सब्बन यांनी, अमेरिका हुकूमशाही पद्धतीने स्वतःच्या स्वार्थासाठी इतर राष्ट्रांवर बंधने लादत असल्याचा आरोप केला. युद्धाच्या माध्यमातून खनिज संपत्ती आणि पर्यावरणाची मोठी हानी होत असून त्याचा फटका जगातील सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. जगाला विनाशाकडे नेणाऱ्या या युद्धाचा शेवटी माणसालाच फटका बसणार असेल, तर या सामर्थ्याचा उपयोग काय?

# कुख्यात डॉन दाऊदच्या मालमत्तेचा लिलाव

■ खेडमधल्या चार भूखंडांची विक्री

**(समर्थ गांवकरी)**

कुख्यात अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहीमच्या रत्नागिरी येथील वडिलोपार्जित जमिनीचा व्यवहार झाला आहे. दोन जणांनी दाऊदशी संबंधित जमीन विकत घेतली आहे. या जमिनींचा लिलाव वारंवार करण्यात आला होता. पण या जमिनीची खरेदी करण्यासाठी कुणीही तयार नव्हतं. आता अखेर दाऊदची वडिलोपार्जित जमीन विकली जाणार आहे. केंद्र सरकारने हा लिलाव आयोजित केला होता. ५ मार्च २०२६ ला केंद्र सरकारने दाऊदच्या रत्नागिरी तालुक्यातील खेड येथील मुम्बके गावात असलेल्या जमिनीचा लिलाव आयोजित केला होता. चार भूखंडांसाठी हा लिलाव आयोजित करण्यात आला होता. हे भूखंड कुख्यात डॉन दाऊद इब्राहीमच्या कुटुंबाचे



आहेत. त्याची आई अमीना बी च्या नावे हे भूखंड होते. या लिलावात मुंबईच्या एका व्यक्तीने चारपैकी एक भूखंड खरेदी केला. तर आणखी एका व्यक्तीने तीन भूखंड सर्वाधिक बोली लावून विकत घेतले. या दोन्ही ग्राहकांची ओळख सरकारतर्फे गोपनीय ठेवण्यात आली आहे. दाऊद इब्राहीम हा भारतातील कुख्यात गँगस्टर आहे. तो ९० च्या दशकातच दुबईला पळाला आहे. सध्या तो कराचीमध्ये आहे अशी माहितीही समोर आली होती. दरम्यान त्याच्या मालमत्तांचा लिलाव केंद्र सरकारने केला आहे. केंद्र सरकारने स्मगलर्स अँड फॉरेन एक्सचेंज मॅनिप्युलेटर्स फॉरफीचर ऑफ प्रॉपर्टी कायदा अर्थात (SAFEMA ) च्या अंतर्गत हे भूखंड जप्त केले होते. ही कारवाई अशा गुन्हेगारांच्या विरोधात होते ज्यांचा संबंध अपराध किंवा तस्करी यांच्याशी जोडलेला असोत. २०१७, २०२०, २०२४ आणि २०२५ अशा वर्षांमध्ये एकूण चारदा या जमिनींचा लिलाव जाहीर करण्यात आला होता. पण कुणीही बोली लावण्यासाठी आलं नाही. त्यामुळे हे भूखंड कोण विकत घेणार असा पेच निर्माण झाला होता. आता मात्र हे चारही भूखंड विकण्यात आले आहेत. NDTV ने हे वृत्त दिलं आहे.

# *गुढीपाडव्याच्या मंगलदिनी गणपतीपुळे मंदिरात आम्रफळांची अप्रतिम आरास; भाविकांची गर्दी*



**रत्नागिरी : (समर्थ गांवकरी)**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्याच्या पवित्र दिवशी आणि हिंदू मराठी नववर्षाच्या स्वागतासाठी गणपतीपुळे मंदिर येथे भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात श्रींच्या समोर नयनरम्य, मनमोहक अशी आम्रफळांची भव्य आरास साकारण्यात आली. या आकर्षक सजावटीने मंदिर परिसर अक्षरशः उजळून निघाला. मंदिराच्या समोरील प्रांगणात "नववर्षाभिनंदन" या संदेशासह रंगीबेरंगी आणि कलात्मक रांगोळी काढण्यात आली होती. या देखण्या रांगोळीने आणि आम्रफळांच्या आरासाने भाविक व पर्यटकांचे लक्ष वेधून घेतले आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला. मालगुंड-गणपतीपुळे परिसरातील ज्येष्ठ आंबा व्यावसायिक अनंत सुधाकर मोरे आणि मोरे परिवाराच्या पुढाकारातून ही विशेष आरास साकारण्यात आली. मंदिराचे मुख्य पुजारी अमित प्रज्ञा प्रभाकर घनवटकर यांच्या हस्ते स्वयंभू श्री लंबोदराच्या मुख्य गाभाऱ्यात भक्तिभावाने ही सजावट अर्पण करण्यात आली. या शुभप्रसंगी मंदिरात भाविकांनी श्रींच्या दर्शनासाठी मोठ्या रांगा लावल्या होत्या. स्थानिकांसह दूरवरून आलेल्या भाविक व पर्यटकांनी श्रींचे दर्शन घेत गुढीपाडवा आणि नववर्षाच्या शुभेच्छांची देवाणघेवाण केली, ज्यामुळे उत्सवाचा आनंद अधिकच द्विगुणित झाला. यावेळी मुख्य पुजारी अमित घनवटकर यांनी सर्वांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देत, "नवीन वर्ष आपल्या सर्वांच्या आयुष्यात आरोग्य, समृद्धी, ऐश्वर्य आणि आनंद घेऊन येवो, तसेच सर्वांच्या मनोकामना पूर्ण होवोत," अशी प्रार्थना स्वयंभू श्रींच्या चरणी अर्पण केली.

# भोंदू अशोक खरातने केलाय १५४ देशांचा प्रवास, भाषांचं ज्ञान

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिकमधला एक भोंदू बाबा स्वतःला कॅप्टन म्हणवून घेत होता. राजकीय वर्तुळात त्याची उठबस होती. मात्र बलात्काराच्या प्रकरणात त्याला अटक झाली. होय कॅप्टन अशोक खरातचीच ही बातमी आहे. धार्मिक आस्थान, दैवी शक्ती, मंत्रतंत्र या सगळ्याच्या पडद्याआडून महिलांचा विश्वास संपादन करुन नंतर त्यांच्यावर हा भोंदू कॅप्टन बलात्कार करायचा असा आरोप त्याच्यावर आहे. त्याच्या अटकेनंतर त्याच्याबाबतची बरीच माहिती समोर आली आहे. ६७ वर्षीय अशोक खरात हा मूळचा सिन्नरचा आहे. शालेय शिक्षणानंतर तो गायब झाला. त्यानंतर अचानक नाशिकमध्ये येऊन त्याने बस्तान बसवलं. मर्चंट नेव्हीत कॅप्टन असल्याचं तो सुरुवातीला सांगत होता. त्यामुळेच त्याला 'कॅप्टन' असं संबोधलं जातं. अशोक खरातला अटक करण्यात आली आहे. रात्री उशिरा ही कारवाई करण्यात आली आहे. ज्यानंतर



आता त्याच्याबाबत या सगळ्या गोष्टी समोर येत आहेत. अशोक खरातने १५४ देशांमध्ये प्रवास केलाय. त्यामुळे त्याला अनेक देशांच्या भाषा बोलता येतात. तसंच अनेक देशांमधल्या चालीरिती आणि धार्मिक परंपरा याचीही त्याला जाण आहे. २२ वर्षे नेव्हीमध्ये नोकरी करताना आपण १५४ देश फिरल्याचं त्याने सांगितलं होती अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. अशोक खरातच्या विरोधात लैंगिक अत्याचाराचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. अशोक खरात याने एका ३५ वर्षीय महिलेला गुंगीचे औषध देऊन बलात्कार केल्याच्या आरोपाखाली त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. बुधवार १८ मार्च रोजी खरात याला पहाटे तीन वाजताच्या सुमारास गुन्हे शाखेकडून ताब्यात घेण्यात आलं. अशोक खरात हा सिन्नर तालुक्यात मिरगाव येथील श्री ईशान्येश्वर मंदिर ट्रस्टचा अध्यक्ष आहे. तो मर्चंट नेव्हीतून निवृत्त झाला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये कॉस्मॉलॉजी एक्स्पर्ट आणि अंकशास्त्रज्ञ म्हणून तो नावारुपाला आला. अनेक बडे राजकीय नेते, सेलिब्रिटी आणि उद्योजक त्याच्याकडे मार्गदर्शनासाठी जातात. मात्र, त्याला बलात्काराच्या आरोपाखाली अटक करण्यात आल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. अशोक खरातला कोर्टात सादर करण्यात आलं. अशोक खरातला २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### अशोक खरातचे ५८ व्हिडीओ जप्त

अशोक खरातचे ५८ व्हिडीओ पोलिसांनी जप्त केले आहेत. या व्हिडीओत काही नामांकित महिला आणि सेलिब्रिटी यांचाही समावेश आहे अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. भविष्य जाणून घेण्यासाठी नेते, सेलिब्रिटी अशोक खरातच्या दरबारात हजेरी लावायचे. अशोक खरातचा एक अश्लील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. तसंच आणखी एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे ज्यात महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या भोंदूबाबाचे पाय धुताना दिसत आहेत. यावरुन आता विरोधक चांगलेच आक्रमक झाले आहेत. रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी खासदार संजय राऊत, शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली आहे.

# रुपाली चाकणकरांचं पद जाणार? थेट राजीनाम्याची मागणी

**(समर्थ गांवकरी)**

नाशिकमधील अशोक खरात प्रकरणाची राज्यात मोठी चर्चा सुरू आहे. या अशोक खरातला बलात्काराच्या आरोपाखाली पोलिसांनी अटक केलं आहे. मात्र, याच अशोक खरातची पाद्यपूजा करताना महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचे काही फोटो समोर आल्यामुळे विरोधकांनी टीकेची झोड उठवली आहे. तसेच रूपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी रुपाली ठोंबरे यांच्यासह विरोधकांनी केली आहे. दरम्यान, याच अशोक खरात प्रकरणावर बोलताना खासदार संजय राऊतांनीही एक मोठं वक्तव्य केलं. 'अशोक खरात प्रकरण एपस्टिन



फाईल्सपेक्षा भयंकर' असल्याचं राऊतांनी म्हटलं. दरम्यान, यासह आज दिवसभरातील राजकीय नेत्यांची पाच महत्वाची विधाने काय आहेत? जाणून घेऊयात.

अशोक खरात या स्वयंघोषित भोंदूबाबाला पोलिसांनी अटक केली. या प्रकरणावर बोलताना खासदार संजय राऊतांनी मोठं वक्तव्य केलं. राऊत म्हणाले की, "महाराष्ट्रातल्या राजकारण्यांचे अध्यात्मिक मार्गदर्शक अशोक खरात यांना बलात्काराच्या प्रकरणात अटक झाली. बलात्काराच्या प्रकरणातलं एक प्रकरण नाही, अनेक प्रकरणं समोर येत आहेत. ५८ व्हिडीओ जप्त करण्यात आले. महाराष्ट्रातल्या सामाजिक, राजकीय आणि इतर क्षेत्रातल्या अनेकांचे पुरावे पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालात आहेत. महाराष्ट्राने अंधश्रद्धा निर्मूलन कायदा मंजूर केला. मग महिला आयोगाच्या अध्यक्षा, मंत्री, आमदार हे सगळे अंधश्रद्धा कुरवाळत कुणी त्या बाबाचं पाद्यपूजन करत आहेत, कुणी पूजेला बसलं. कुणी जादूटोणा करतंय. ज्यांची छायाचित्रं आली आहेत त्या सगळ्यांवर फडणवीसांनी गुन्हे दाखल केले पाहिजे. चाकणकर या महिला आयोगाच्या अध्यक्षा आहेत. त्यांचं काम असतं की महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडणं. पण जर बलात्कार करणाऱ्या व्यक्तीचे पाय रुपाली चाकणकर धुत असतील, मंत्री त्यांच्या चरणाशी बसत असतील तर या सगळ्यांना पदावर कसं काय ठेवू शकतात?. अशोक खरातचं प्रकरण हे एपस्टिन फाईल्सपेक्षा भयंकर आहे", असं संजय राऊतांनी म्हटलं आहे.

राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी केली. चाकणकरांना सहआरोपी करुन याप्रकरणाशी निगडीत सर्वांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी रुपाली ठोंबरे पाटील यांनी केली. महिला आयोगाच्या अध्यक्षांचे असलेले पाठबळ यामुळे अशोक खरात या भोंदू बाबाची हिम्मत वाढल्याचा आरोप पाटील यांनी केला. "अशा पाठिंब्याशिवाय खरातच नव्हे कुठल्याच गुन्हेगाराची हिम्मत वाढणार नाही. शिवाय यात आणखी कोणाचे राजकीय हस्तक्षेप आहेत का? याचाही तपास करण्याची गरज आहे. वर्षभरापूर्वी प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या आधारे अशोक खरातची राज्य महिला आयोगाने चौकशी करायला हवी होती. तसेच संबंधित महिलेची तक्रार घेऊन गुन्हा दाखल करायला हवा होता. यामुळे ५८ महिला या अत्याचाराला बळी पडल्या नसत्या. चाकणकर पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष असल्याने बदनामी होत आहे. बदनामी होऊ नये म्हणून त्यांनी राजीनामा मागितला होता.

पण पक्षामध्ये पण काही नेते आहेत त्यांच्यावर देखील खरातच्या माध्यमातून वशीकरण करण्यात आलं असं वाटंत आणि म्हणून तो राजीनामा होत नाही. येत्या काळात राजीनामा होत नाही म्हणून प्रयत्न करणाऱ्या नेत्यांची नावे समोर येतील. कारवाई करु नये म्हणून पोलिसांना फोन करणाऱ्या नेत्यांची नावे देखील समोर आणणार", असं रुपाली ठोंबरे पाटील म्हणाल्या आहेत.

# उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली नववर्ष स्वागत यात्रा

**ठाणे: (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगरपालिका आणि कोकणेश्वर सांस्कृतिक न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आज ठाणे शहरात नववर्ष स्वागत यात्रा मोठ्या उत्साहात काढण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकाळी सात वाजता कोपिनेश्वर मंदिरात पालखीचे विधिवत पूजा केल्यानंतर या यात्रेला प्रारंभ करण्यात आला. यावेळी स्वागतयात्रेच्या स्वागताध्यक्ष डॉ.धनश्री लेले उपस्थित होत्या. या शोभायात्रेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर निरंजन डावखरे, महापौर शर्मिला पिंपळकर, महापालिका आयुक्त सौरभराव उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे यांच्यासह नगरसेवक पवन कदम,




संजय वाघुले, नारायण पवार, मृणाल पेंडसे, नम्रता कोळी, माधुरी मेटांगे आदी सहभागी झाले होते. तसेच कोपिनेश्वर सांस्कृतिक चे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विविध लोककलांचे सादरीकरण, सामाजिक संदेश देत जनप्रबोधन करणारे नाविन्यपूर्ण चित्ररथ, ढोल - ताशांचा गजर,एरियल सिल्क, मल्लखांब, जिमनॅस्टिकची चित्तथरारक प्रात्यक्षिके, पारंपरिक वेशभूषेतील सायकल रॅली, विविध संस्थांची पदयात्रा,महिलांची बाईक रॅली आदींचा समावेश या स्वागत यात्रेत होता. पारंपरिक वेशभूषा करत सहभागी झालेले नागरिकांच्या अभूतपूर्व गर्दीत , रांगोळीच्या पायघड्यावरून पालखी जांभळी नाक्यावरून दगडी शाळेजवळ आल्यावर चित्ररथ यात्रेत सहभागी झाले. दरम्यान चिंतामणी चौक, हरिनिवास सर्कल,गोखले रोड या तीन ठिकाणी पालखीवर पुष्पवृष्टी झाली. यंदा पहिल्यांदाच तृतीयपंथी समाजाचा लक्षणीय सहभाग होता. त्यांनी समानतेचा संदेश दिला. कर्नाटक सांस्कृतिक मंचने आपल्या सादरीकरणातून संस्कृतीचे दर्शन घडवले. भगिनी निवेदिता यांचा पर्यावरणाचा संदेश देणाराचित्ररथ,टीजेएसबी बँक यांचे चित्ररथ आकर्षण बिंदू ठरले. वनवासी कल्याण आश्रम यांनी तारपा नृत्य सादर केले.

येऊर येथील एकलव्य क्रीडा मंडळ यांचा वारकरी आणि धारकरी यांचा संगम असलेले सादरीकरण केले. मन:शक्ती केंद्राचे वैचारिक प्रदूषण, तृतीयपंथी यांची इलेक्ट्रीक गुलाबी रिक्षा,ठाणे नेत्ररोगतज्ञ असोसिएशन यांचा काचबिंदू विषयी जनजागृती करणारा चित्ररथ असे नाविन्यपूर्ण विषयांचे सादरीकरण स्वागतयात्रेत दिसून आले. तीन पेट्रोल पंप जवळ एरियल सिल्क, हरी निवास सर्कल कबड्डी प्रात्यक्षिके , मल्हार चौकात, गोखले रोड,पू न गाडगीळ चौक जिमनॅस्टिक सादरीकरण झाले.

# अहिल्यानगर ते छत्रपती संभाजी नगर रस्त्यावर खड्डेच खड्डे

## झोपलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग कधी येणार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर गेल्या वर्षभरापासून मोठमोठे खड्डे पडले आहेत .ज्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. जेऊर ,पांढरी पुल, घोडेगाव, वडाळा बहिरोबा, शिंगवे तुकाई फाटा, आणि धनगरवाडी या परिसरात खड्ड्यांची संख्या जास्त आहे . अहिल्यानगर (अहमदनगर) ते छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) हा महामार्ग राज्य महामार्ग असल्याने त्याच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागावर आहे. या रस्त्याने जाताना रस्त्यात खड्डे की खड्ड्यांत रस्ता हे कळतच नाही .या खड्ड्यांमुळे वाहनांची गती अतिशय संथ होऊन वाहतुकीची कोंडी व अपघात वाढले असून सामान्य अंतर पूर्ण करण्यास तिप्पट वेळ लागत आहे .या रस्त्यावरुन



वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असुन सुद्धा बांधकाम विभागाचे पुर्ण दुर्लक्ष झाले आहे . हा रस्ता राज्य मार्ग आहे की एखाद्या गावात जाणारा रस्ता आहे असा प्रश्न नागरिकांना पडत आहे .वास्तविक पाहता अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर ही शहरे अतिशय सुधारित असून एमआयडीसीमुळे येथे अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे .अनेक मोठे प्रोजेक्ट या दोन्ही शहरामध्ये आहेत . तरी देखील या दोन्ही शहराला जोडणारा रस्ता इतका दुर्लक्षीत होऊ शकतो .याचे आश्चर्य या रस्त्यावरुन जाताना कळते . या रस्त्यावरुन जाताना

वाहनचालक आणि स्थानिक नागरिक त्रस्त असून सुद्धा झोपलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येत नाही .सार्वजनिक बांधकाम विभागाने वाहन चालकांना व प्रवाशांना होणाऱ्या त्रासा कडे बघुन ताबडतोब रस्ता दुरुस्ती करावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वघई पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी : काही तासांत पिकअप चोरीचा उलगडा, दोन आरोपी अटक



**डांग गुजरात : (समर्थ गांवकरी)**

डांग जिल्ह्यातील वघई टाऊन परिसरातून रात्रीच्या वेळी चोरीला गेलेल्या पिकअप वाहनाच्या प्रकरणाचा उलगडा वघई पोलिसांनी अवघ्या काही तासांत केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून सुमारे ८ लाख रुपये किमतीचे वाहन जप्त केले आहे. फिर्यादी महमद अयाज नासीरभाई धानाणी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे पिकअप वाहन (नोंदणी क्रमांक: GJ-26-U-1848) वघई येथील हनुमान फळिया पुलाजवळ रस्त्याच्या कडेला उभे केले होते. रात्री अज्ञात चोरट्यांनी हे वाहन चोरी करून पसार झाले. या प्रकरणी वघई पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता 2023 च्या कलम 303(2) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन डांग जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या पथकांची स्थापना करण्यात आली. वघई पोलीस ठाण्याचे पीआय वी. के. गढवी यांच्या पथकाने तांत्रिक तपास (टेक्निकल सर्व्हेलन्स) तसेच मानवी माहितीच्या आधारे तपास सुरू केला. गुजरात-महाराष्ट्र सीमावर्ती भागात सखोल तपास करत संशयितांची चौकशी करण्यात आली. अखेर पोलिसांनी काही तासांतच कारवाई करत सीमेजवळून दोन आरोपींना मुद्देमालासह अटक केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत:देविदास रामजयाभाई भोये (वय ४२, रा. मोटामाळगाव, ता. सूरतगाणा, जि. नाशिक, महाराष्ट्र)

मधुभाई रामजयाभाई भोये (वय ३५, रा. जामनविहिर गाव, ता. आहवा, जि. डांग)दोन्ही आरोपींविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू असून, या कामगिरीमुळे वघई पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अल्पवयीन विद्यार्थिनीला छेडले

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील एका उपनगर भागात राहणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीला (वय १४) शाळेत जात असताना एका तरूणाने अडवून छेडछाड केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी संबंधित तरूणाविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साहिल अनिस शेख (रा. मोरया पार्क, बोल्हेगाव) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित तरूणाचे नाव आहे. याप्रकरणी पीडितेने बुधवारी (१८ मार्च) दुपारी फिर्याद दिली आहे. पीडित विद्यार्थिनी ही शिक्षण घेत असून ती दररोज सकाळी शाळेत जात असते. तिच्या जबाबानुसार, साहिल शेख हा मागील काही काळापासून तिच्याकडे विचित्र नजरेने पाहत होता.

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेवर भाजपाचा वरचष्मा

- **अध्यक्षपदी अविनाश गलांडे, उपाध्यक्षपदी जितेंद्र जैस्वाल बिनविरोध**

**(समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषदेच्या निवडणुक निकालानंतर अध्यक्ष पदासाठी सर्वच पक्षांची मोर्चेबांधणी सुरु होती यामध्ये फोडा फोडीचे राजकारण, मनधरणी करण्याचे प्रयत्न केले गेले. अनेकांनी अध्यक्षपदासाठी नावे निश्चीत झाल्याचा विश्वासही व्यक्त केला होता. परंतु या सर्वांना तोंडघशी पाडण्यात भाजपा यशस्वी ठरली आणि जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या निवड प्रक्रियेत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुने यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पडली यामध्ये भाजपाचे महालगाव



(ता. वैजापूर ) गटाचे अविनाश पाटील गलांडे यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी बाबरा (ता. पुलंब्री ) गटाचे जितेंद्र जैस्वाल यांची बिनविरोध निवड झाली. त्यामुळे भाजपाचा वरचस्मा सिद्ध झाला आहे. मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद निवडनुकीवर विधानसभेची गणिते जुळविली जातात त्यामुळे सर्वच पक्ष आपली ताकद अजमावत असतात. शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे पालकमंत्री, एक खासदार, चार आमदार असल्यामुळे जिल्हा अध्यक्ष त्याच पक्षाचा व्हावा यासाठी पुरेपुर प्रयत्न सुरु होते. मतांची जुळवा जुळव सुरु असतांना अध्यक्षपदासाठी खासदार संदिपान भुमरे हे त्यांचे पुतने शिवराज भुमरे यांच्या साठी प्रयत्नात होते तर दुसरी कडे आमदार अब्दुल सत्तार आपले पुत्र आमेर सत्तार यांना अध्यक्ष बनविल्या साठी प्रयत्नशील होते परंतु या दोघांच्या अंतर्गत वादाचा फायदा घेत भाजपाने उबाठाचे तीन, राष्ट्रवादी, प्रहार व अपक्ष यांचे प्रत्येकी एक सदस्यांचा पाठिंबा मिळवत बहुमताचा आकडा गाठण्यात यश मिळविले . त्यामुळे बहुमतात असलेल्या शिवसेना (शिंदेगट) पक्षाला अल्पमतात जावे लागले. म्हणुन अध्यक्षपदाच्या निवड प्रक्रियेवेही बहिस्काराची घोषणा करून अनुपस्थिती दर्शविली त्यामुळे अध्यक्षपदाची निवडणूक भाजपासाठी सुकर झाली.

**निवडणूकीच्या निकालानंतर महायुतीचे ठरल्याप्रमाणे आम्ही शिवसेनेला उपाध्यक्ष पद दिले असते परंतु त्यांनी निवडणूक मतदानाच्या वेळी अनुपस्थित राहुन बहिष्कार टाकला**
**- अतुल सावे मंत्री भाजपा**

# वडोलीत ग्रामपंचायत हद्दीत १७ सोलर स्ट्रीट लाईटचे उद्घाटन

**पालघर : (समर्थ गांवकरी)**

मराठी दिन व गुढी पाडव्याचे औचित्य साधत तालुक्यातील वडोली ग्रामपंचायत हद्दीत १७ सोलर स्ट्रीट लाईटच्या उभारणीचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमामुळे गावातील अंधारमय भाग उजळणार असून ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच सौ. कामिनी दीपक गावंढा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही योजना साकार झाली. प्राईड डांडिया फाउंडेशनच्या माध्यमातून १२ सोलर स्ट्रीट लाईट, तर मेलजोल संस्थेकडून ५ स्ट्रीट लाईट उपलब्ध करून देण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन माजी सरपंच के. के. हिरकुडा व आखर



ग्रामपंचायतीचे सरपंच धीरज घुमल यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करून करण्यात आले. कार्यक्रमाला आदिवासी सेलचे उपाध्यक्ष संजय रानडा, दीपक गावंढा, ग्रामपंचायत ऑपरेटर संदीप कनोजा, चेतन हिरकुडा, देविदास वड, राहुल शिंगडा यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांमध्ये भर पडत असून स्वच्छ ऊर्जेच्या वापराला चालना मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# ट्रॅक्टर अपघातात सरपंचाचा मृत्यू

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथील डोंगरचा मळा परिसरात ट्रॅक्टर पलटी होऊन झालेल्या अपघातात गावच्या सरपंच उज्वला सागर कापसे (वय-३७) यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गेल्या दि.१८ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. निमगाव वाघा शिवारातील डोंगरचा मळा परिसरात उज्वला कापसे यांची शेती आहे. त्या व त्यांचे पती सागर हे शेतामधून मका भरून ट्रॅक्टरने गावाकडे येत होत्या. यावेळी ट्रॅक्टरमध्ये मका भरलेला होता आणि सरपंच कापसे ट्रॅक्टरवर बसलेल्या होत्या. दरम्यान, रस्त्यावर अचानक ब्रेक मारल्यामुळे ट्रॅक्टरचा ताबा सुटून ट्रॅक्टर पलटी झाला. या अपघातात ट्रॅक्टर खाली दबल्या गेल्याने सरपंच उज्वला कापसे यांचा जागीच मृत्यू झाला.

# उदापुरला गुढीपाडव्याच्या निमित्ताने पंचांग वाचण्याची शेकडो वर्षांची परंपरा कायम

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

उदापुर ता:-जुन्नर येथे गेली शेकडो वर्षांपासून गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर अर्थात मराठी नववर्षाच्या पहिल्या दिवशी पंचांग वाचन केले जाते. ही गेली शेकडो वर्षांची परंपरा असून संपूर्ण वर्षभराचे नियोजन शेतकरी या आधारावर करत असतात.यात चालू वर्षाचे पर्जन्यमान,हवामान याचा अंदाज वर्तवला जातो.सकाळी गुढी उभारल्यानंतर गावातील ग्रामस्थ ग्रामविकास मंडळाच्या कार्यालयात पुढील वर्षाचे यात्रा जत्रा,हरिनाम सप्ताह,विविध सणवार महोत्सव यांचे नियोजन करण्यासाठी ग्रामसभा घेतात व दुपारी बारा वाजता गावाच्या कुसाला असणाऱ्या मठातील दंडाळेश्वर महादेव मंदिर परिसरात जमतात त्याठिकाणी पंचांगाचे पूजन केले जाते.येथे गावातील भराडी समाजाचे दत्तात्रय हराळ व दंडाळेश्वर देवस्थान चे पुजारी मच्छिंद्र भारती



परंपरेनुसार पान गुढ्यांचे नियोजन करून ठेवतात.

पंचांगाच्या सुरवातीला चालू संवत्सराचे (वर्षाचे) नाव वाचले जाते.ते साठ वर्षांच्या चक्रातील एक असते.त्याचा निसर्ग व मानवी जीवनावर परिणाम मानला जातो. त्यानंतर एक एक पान गुढीची पूजा केली जाते हा मान गावातील ढमढेरे कुटुंबातील धनंजय ढमढेरे व थोरले शिंदे परिवारातील अविनाश शिंदे यांना दिला गेला.यावेळी पंडित वैद्य यांनी गुढ्यांचे उघडुन वाचन केले यात वर्षफल (भविष्यफल):- यात देशाची स्थिती,पर्जन्यमान, आरोग्य विषयक अंदाज, राजकीय परिस्थिती यावर भाष्य केलेले असते.तसेच वर्षभरातील सण,वार सुवर्ण खरेदीचे मुहूर्त, साडेतीन मुहूर्त कधी आहेत याचे देखील वाचन केले जाते. नवीन वर्षाच्या पूर्व संधेला गावातील अनेक ग्रामस्थ, जेष्ठ मंडळी,तरुण मंडळी यात ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष संजीव शिंदे व सर्व संचालक मंडळ,श्रीराम देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष तुळशीराम शिंदे सर्व सदस्य,विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे, व सर्व सभासद तंटामुक्तीचे अध्यक्ष बाजीराव कुलवडे व सर्व संचालक,जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भागूजी कुलवडे व सर्व सदस्य हे संवत्सर फल आवर्जून ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यातून शेतकरी बांधवांना संपूर्ण पावसाचा अंदाज दिला जातो.तसेच ते आपल्या शेतीचे नियोजन देखील याच आधारावर करत असतात.त्यामुळे ग्रामीण भागात या परंपरेला अनन्य साधारण महत्व आहे.

शेवटच्या टप्प्यात सर्वांना ज्वारीचे दाणे वाटप केले जातात आणि ते दोन दोन असे जोडून वाढविण्याची पद्धत असून एक दाणा वाढणे म्हणजे शुभ (पास) आणि न वाढणे म्हणजे अशुभ (नापास) अशी देखील भावना जपली जाते.या परंपरेला ग्रामीण भागात महत्व असून त्याचे वाचन आणि श्रवण हे आवर्जून केले जाते.यंदाच्या अंदाजात चांगले पर्जन्यमान असून प्रत्येक ऋतूमध्ये समाधान कारक पाऊस होणार असून काही ठिकाणी अतिवृष्टी देखील सांगितली आहे.ऑगस्ट महिन्या च्या सुरवातीला पाऊस कमी असून उत्तरार्धात मात्र त्याची भरपाई होईल असे पंचांग वाचक पंडित वैद्य यांनी सांगितले आहे.जुलै व ऑगस्ट मधे नदी,नाले, धरणे ही जलमय होण्याचा अंदाज आहे.अशी समाधानकारक बाब या पंचांगा च्या माध्यमातून समोर आली आहे. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

**जाहीर समन्स**

**गेवराई येथील श्री. एच. एम. मोमीन २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांच्या न्यायालयात..**

नियमित दिवाणी वाद क्र. ४४६ / २०२१

**महेश वि. भानुदास व इतर**

**प्रति, प्रतिवादी क्र. ५..... अशोक भानुदास काळे,**
रा. तलवाडा, ता. गेवराई जि. बीड, ह.मु. भुजबळ वस्ती हिंजवडी, वाकड रोड, वाकड, पुणे शहर पुणे. ४११०५७ मो.नं. ९६०७२४२४७७, ९०७५७४४७४२

ज्याअर्थी वादी यांनी दाव्याची प्रत सोबत जोडलेली नाही. यासाठी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक **२१/०४/२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरीत्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्त्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तरे देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तरे देऊ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद सेट ऑफ्फ किंवा प्रतिवाद; काउंटर क्लेमध्द ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या सेट ऑफ किंवा प्रतिवादाच्या काउंटर क्लेम पुष्ट्यर्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी. समन्स मिळाल्यापासून ३० दिवसांत लेखी कैफियत दाखल करावी. तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक १८/०३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिले.

आदेशावरून,
(सही/शिक्का) स.अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

सूचना – १. तुमचे साक्षीदार स्वतः होऊन उपस्थित राहणार नाहीत अशी तुम्हाला धास्ती वाटत असेल तर न्यायालयाकडे अर्ज केल्यास व आवश्यक तो खर्च भरल्यास, कोणत्याही साक्षीदारास उपस्थित राहण्यास भाग पाडण्यासाठी व जो कोणताही दस्तऐवज हजर करण्यास साक्षीदारास सांगण्याचा तुम्हाला हक्क असेल तो दस्तऐवज हजर करण्यास भाग पाडण्यासाठी तुम्हाला या न्यायालयाकडून समन्स मिळू शकेल. २. वादीचे मागणे तुम्हाला मान्य असल्यास, हुकूमनाम्याची बजावणी टाळण्यासाठी तुम्ही वादाची रक्कम खर्चासह न्यायालयात भरावी. हुकूमनाम्याची बजावणी तुमच्यावर जातीने आली किंवा तुमच्या मालमत्तेवर किंवा या दोन्हीवर होऊ शकेल.

# श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांचा जन्मभूमी महोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा

**नेवासा : (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील तीर्थक्षेत्र गोधेगाव येथे गुढीपाडवा व मराठी नववर्षाच्या निमित्ताने गुरूदेव दत्त पिठाचे उद्धारक श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांचा जन्मभूमी महोत्सव गुरूवारी दि.१९ मार्च रोजी गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबा यांच्या प्रेरणेने व देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या किर्तन सोहळयाने भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी झालेल्या जन्मभूमी महोत्सवाच्या निमित्ताने भागवताचार्य स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते मंदिरासमोर उभारण्यात धर्म ध्वजाचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या जन्मस्थानासह त्यांच्या पादुकांचे व उभारण्यात आलेल्या गुढीचे पूजन



करण्यात आले.यावेळी झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य प्रवरासंगमचे वेदशास्त्रसंपन्न कांतागुरू जोशी व स्वानंद जोशी यांनी केले. यावेळी झालेल्या कीर्तन सोहळयात बोलताना गुरुवर्य श्री स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज म्हणाले की गोधेगाव ही भूमी श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या चरणरजाने पवित्र पावन झाली आहे,समाजाच्या उद्धारासाठी व जगाला सन्मार्ग दाखवण्याकरता संत भूतलावर अवतार घेतात,श्री सदगुरू किसनगिरी बाबांनी अशी भक्ती केली की जगाच्या मालकाला देखील बाबांच्या आज्ञेचे पालन करावे लागले,कारण त्यांच्या चित्तात कोणतीही आस नव्हती,हा भक्तीचा मोठा अधिकार आहे

किसनगिरीबाबांची उदी भक्तांना प्रसाद रूपाने मिळाली होती अनेकांचा त्यांनी उद्धार केला देवगड दत्त पिठाच्या निर्मिती त्यांच्या हातून व्हायची होती म्हणूनच तर येथे अवताराला आले असल्याचे त्यांनी अनेक त्यांच्या लीला व महिमा सांगून स्पष्ट केले.

श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या पुण्यतिथी सोहळयाला गोधेगावची मंडळी ही मोठया संख्येने दिंडीत आली याबद्दल गुरुवर्य बाबांनी समाधान व्यक्त केले असल्याचे सांगत यामुळे निश्चितच गोधेगावकरांवर बाबांच्या आशीर्वादाची थाप असल्याचे गौरवोदगार स्वामींनी यावेळी बोलतांना काढले.त्यागाची समर्पणासह गुरुभक्तीची परंपरा देवगडची असल्याचे त्यांनी सांगितले पैठण येथील नाथांच्या षष्ठी प्रमाणेच सदगुरू किसनगिरी बाबांची पुण्यतिथी सोहळयाची अष्टमी देखील मोठ्या वैभवात साजरी व्हायला लागली असल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले. निरपेक्ष व अपेक्षारहित भक्ती भगवंताला आवडते,भक्तीच्या माध्यमातून देवाला ही दास बनविण्याचे सामर्थ्य देवगडच्या संतांमध्ये असल्याचे त्यांनी सांगितले गुढीपाडवा सणाचे महत्व विषद करतांना त्यांनी प्रभू रामचंद्र भगवंताचे लंकेहुन विजयी पताका घेऊन आगमन हे गुढी उभारून झाले,सदगुरू किसनगिरी बाबांचा जन्मभूमी महोत्सव हा गुढी उभारूनच साजरा केला जातो अधर्मावर धर्माची गुढी हे विजयाचे प्रतीक असल्याचे स्वामींनी यावेळी बोलताना सांगितले.आपल्या मुलांवर आईवडील,गोमाता,साधुसंतांची सेवा घडेल असे संस्कार करा,गो मातेचे पालन व तिचे रक्षण करा,संतांच्या संगतीत राहून परमार्थ करण्याचा प्रयत्न करा असे आवाहन स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराजांनी यावेळी बोलताना केले यावेळी झालेल्या जन्मभूमी सोहळयास श्रीराम साधना आश्रमाचे महंत सुनीलगिरी महाराज,महंत गोपालानंदगिरी महाराज,हभप दिनकरजी महाराज मते,आमदार विठ्ठलराव लंघे पाटील,मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष युवा नेते उदयनदादा गडाख पाटील, रामनाथ महाराज पवार,गणपत महाराज आहेर,लक्ष्मण महाराज नांगरे,बाळू महाराज कानडे,पंढरीनाथ महाराज मिस्तरी,नारायण महाराज ससे,हभप अशोक महाराज गिरी,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,श्रीधर महाराज अनुभुले,शंकर महाराज तनपुरे,शशिकांत महाराज कोरेकर यांच्यासह संतमंडळीसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महाआरती करून जन्मभूमी महोत्सवाची सांगता करण्यात आली. जन्मभूमी महोत्सवात अन्नदान करणाऱ्या अन्नदात्यांचा गौरव स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते श्रीफळ प्रसाद देऊन करण्यात आला.उपस्थित पंचक्रोशीतील हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# पत्रकारांच्या मागण्यांवर शासनाशी सकारात्मक चर्चा






## वाशीम अधिवेशनातील ठरावांचे मुख्यमंत्री व मंत्र्यांना निवेदन : डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या पुढाकाराने पत्रकारांच्या मागण्यांचा मुद्दा थेट शासन दरबारी!

मुंबई : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे वाशीम येथे नुकतेच २७ वे राज्य अधिवेशन संपन्न झाले होते. या अधिवेशनात पत्रकारांच्या हितासाठी विविध महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले होते. त्या ठरावांचे सविस्तर निवेदन आज मुंबईतील विधान भवन येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच विविध विभागांच्या मंत्र्यांना सादर करण्यात आले. राज्य सरचिटणीस तथा दैनिक 'समर्थ गांवकरी'चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी मुख्यमंत्री व मंत्रिमंडळातील सदस्यांशी प्रत्यक्ष भेट घेऊन वाशीम अधिवेशनात मंजूर झालेल्या पत्रकारांच्या विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली. यामध्ये पत्रकारांची सुरक्षा, मानधनवाढ, आरोग्य व अपघात विमा योजना,



शासकीय सवलती तसेच पत्रकारांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींचा समावेश होता. या सर्व मुद्द्यांवर शासनाने सकारात्मक भूमिका दर्शवली असून लवकरच ठोस निर्णय घेतले जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या भेटीदरम्यान नूतन राज्यसभा खासदार रामराव वडकुते, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शिवेंद्रसिंहराजे भोसले, नरहरी झिरवाळ, शिक्षणमंत्री दादा भुसे, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, आदिती तटकरे, पंकजा मुंडे यांच्यासह संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे, आमदार हिरामण खोतकर, काशिनाथ दाते, विक्रमसिंह पाचपुते आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांचा 'समर्थ गांवकरी' दिनदर्शिका व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. तसेच ज्येष्ठ पत्रकार वाणी यांच्यासह अनेक पत्रकार प्रतिनिधींनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

या प्रसंगी संजय फुलसुंदर (महाव्यवस्थापक, दैनिक समर्थ गांवकरी), नयन डुंबरे (मंत्रालय संपर्कप्रमुख) तसेच विष्णू बुरे (मंत्रालय प्रतिनिधी) यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. एकूणच, वाशीम अधिवेशनात मांडण्यात आलेल्या पत्रकारांच्या विविध मागण्यांवर शासन स्तरावर सकारात्मक निर्णय होतील, अशी आशा या भेटीद्वारे व्यक्त करण्यात आली असून पत्रकारांच्या हक्कांसाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

## उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सौ. परीघा आरोटे यांचा गिरीजाताई पिचड यांच्याकडून सत्कार!



अकोले : (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या आदर्श महिला विकास संस्थेच्या उपाध्यक्षपदी सौ. परीघा विश्वासराव आरोटे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. अकोले येथील महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या संचालिका म्हणून कार्यरत असलेल्या सौ. परिघा आरोटे यांनी विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या नेत्या तथा माजी मंत्री मधुकरराव पिचड यांची नात गिरीजाताई पिचड यांच्या हस्ते सौ. परिघा आरोटे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सौ. परिघा आरोटे यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्या कार्यातून संस्थेची प्रगती अधिक वेगाने होईल, असा विश्वास व्यक्त केला.

## बुधवारी राहुरी तालुक्याच्या काही भागात गारपीट

राहुरी : (समर्थ गांवकरी)

बुधवार दि १८ मार्च रोजी सायंकाळी राहुरी तालुक्यातील दक्षिण भागातील अनेक गावांना वादळी वाऱ्यासह गारपिटीचा फटका बसला .परिणामी उभ्या शेतातील पिकांचे नुकसान झाल्याचे वृत्त आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या इशाऱ्यानंतर आज दुपारनंतर राहुरी शहर व तालुक्यातील बहुतांश ठिकाणी ढगाळ वातावरण तयार झाले .सायंकाळी पाच वाजेनंतर अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस व काही ठिकाणी गारांच्या पावसाने विजांच्या कडकडाटात पाऊस झाला. राहुरी तालुक्यातील वांबोरी कडील काही गावांमध्ये विशेष करून खडांबे , धामोरी , नांदगाव , शिंगवे या भागातील बहुतांश भागात गारपीट झाल्याचे वृत्त आहे.

## अकोले तालुक्याचा मानाचा तुरा दिल्लीत झळकला

### कृषी तज्ज्ञ संजय वाकचौरे यांना राष्ट्रीय सेंद्रिय शेती पुरस्कार!

डोंगरगाव : (समर्थ गांवकरी)

दिनांक १७ मार्च २०२६ रोजी अकोले तालुक्याचा मानाचा तुरा थेट दिल्लीच्या दरबारी झळकला. तालुक्यातील पिंपळगाव निपाणी येथील शेतकरी पुत्र व कृषी तज्ज्ञ संजय देविदास वाकचौरे यांना भारत सरकारच्या ऑरगॅनिक फार्मिंग उपक्रमांतर्गत राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गणोरे-डोंगरगाव परिसरात संजय वाकचौरे यांनी झिरो बजेट सेंद्रिय शेतीचा आदर्श उभा केला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत केंद्र शासनाच्या 'क्षेत्रीय जैविक एवं प्राकृतिक खेती केंद्र' यांच्या वतीने त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यास प्रादेशिक संचालक डॉ. अजय सिंह राजपूत,



संचालक डॉ. गगणेश शर्मा (एनसीओएनएफ, गाझियाबाद), कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी डॉ. स्वप्निल मगर (नागपूर), तसेच कृषी क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना संजय वाकचौरे म्हणाले की, सेंद्रिय, निसर्ग व रसायनमुक्त शेतीचे महत्त्व समजून घेणे आजच्या काळाची गरज आहे. रासायनिक खतांचा अतिरेकी वापर केल्याने शेतीचे तसेच पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. उपयुक्त कीटक नष्ट होत असून रोगराई वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळेत सावध होऊन सेंद्रिय शेतीकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केले. ते पुढे म्हणाले की, "आजच्या शेतीवरच भावी पिढीचे भविष्य अवलंबून आहे. सशक्त, समृद्ध आणि निरोगी भारत घडवायचा असेल तर सेंद्रिय शेतीची चळवळ उभारणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे." यावेळी संचालक डॉ. गणेश शर्मा यांनी सांगितले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन दिले जात असून भविष्यात संपूर्ण देशात विषमुक्त शेतीचा विस्तार होणार आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. स्वप्निल मगर यांनी उपस्थितांचे आभार मानले. संजय वाकचौरे यांच्या या यशामुळे अकोले तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव देशपातळीवर उज्ज्वल झाले आहे.

## श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याला आजपासून सुरुवात

जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)

उत्कर्ष मंडळ,श्रीराम देवस्थान ट्रस्ट आणि पांडुरंग देवस्थान ट्रस्ट सावरगाव आणि समस्त ग्रामस्थ सावरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबाद प्रमाणे या वर्षी देखील श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याला आजपासून सुरुवात झाली सकाळीच श्रीराम देवस्था न ट्रस्टचे अध्यक्ष आणि विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे तज्ञ संचालक वैभव कोरडे यांच्या शुभहस्ते महारुद्र अभिषेक संपन्न झाला त्यानंतर वारकरी बांधवांच्या शुभहस्ते विना पूजन संपन्न झाले व या श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याला आजपासून सुरुवात झाली.

महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांच्या उपस्थितीमध्ये हा अखंड हरिनाम सप्ताह संपन्न होणार आहे यामध्ये.हरिभक्त परायण लक्ष्मण महाराज कुंडगर (देहू),केशव महाराज मुळीक (आळंदी),देवराम महाराज गायकवाड(दौंड),पारस महाराज मुथ्था(अहिल्यानगर),संजय महाराज धोंडगे (नाशिक), अभिमन्यू महाराज कदम (नातेपुते),संतदास महाराज मनसुख (सावरगाव) आणि पांडुरंग महाराज घुले अध्यक्ष गाथा मंदिर देहू(तुकारामवाडी) या सर्व नामवंत कीर्तनकारांच्या उपस्थितीमध्ये हरिकीर्तनाचा कार्यक्रम संपन्न होऊन श्रीराम जन्मोत्सव सोहळा संपन्न होणार आहे.दररोज पहाटे काकडा भजन नंतर गाथा भजन सायंकाळी हरिपाठ आणि रात्री सात ते नऊ यावेळी मध्ये हरिकीर्तन संपन्न होणार आहे कीर्तन संपन्न झाल्यानंतर सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

## राज्यातील धरणांमध्ये ७ टक्के अधिक पाणीसाठा

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

राज्यात लहान, मध्यम व मोठे एकूण एकत्रित सुमारे 3011 इतकी धरणे असून यावर्षीच्या 17 मार्च 2026 अखेर या सर्व धरणांमध्ये सुमारे 58.56%टक्के ( 841.675 TMC टीएमसी ) इतका उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती जलसंपत्ती अभ्यासक व जल सिंचन तज्ञ इंजि. हरिश्चंद्र चकोर यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे. त्याचबरोबर गतवर्षी 17 मार्च 2025 रोजी राज्यातील धरणांमधील उपयुक्त पाणीसाठा हा फक्त 51.87% म्हणजेच 745.520 टीएमसी इतकाच होता , मात्र यावर्षी सुमारे 7 % इतका उपयुक्त पाणीसाठा जास्त आहे . पुढे बोलताना श्री चकोर यांनी सांगितले की, राज्यात सहा(६) महसुली विभाग असून 17 मार्च 2026 रोजी उपयुक्त पाणी साठ्या ची स्थिति खालील प्रमाणे आहे.

## दिवाळीत जामखेडकरांना उजनीचे पिण्याचे पाणी : नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी

### दहीगाव पाणी योजनेची नगरपरिषदेकडून प्रत्यक्ष स्थळपहाणी

जामखेड : (समर्थ गांवकरी)

जामखेड शहर व उपनगराच्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उजनी बॅकवॉटर दहीगाव पाणी योजनेची नगरपरिषदेकडून प्रत्यक्ष स्थळपहाणी करण्यात आली. नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, उपनगराध्यक्ष, नगरसेवक तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी दहीगाव येथे जाऊन कामाची पाहणी केली. सन २०२७ मधिल दिवाळी दरम्यान जामखेडकरांना उजनीचे पिण्याचे पाणी देण्याचे आश्वासन नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.



जामखेड शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी राज्याचे तत्कालीन जलसंधारण मंत्री तथा विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून राज्याच्या नगरोत्थान अभियानांतर्गत तब्बल २५० कोटी रूपयांची उजनी दहिगाव येथून तब्बल ६५ किलोमीटर अंतरावरून जामखेड शहरासाठी पाणी योजना मंजूर आहे. या योजनेचे बरेचसे काम झाल्यानंतर काही तांत्रिक अडचणींमुळे हे काम थांबले होते. मात्र जामखेडचे भूमीपुत्र विधानपरिषद सभापती प्राध्यापक राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेवर भाजपची सत्ता आल्यानंतर सर्व विषय समित्यांचे सभापती व नगरसेवक यांना विश्वासात व बरोबर घेऊन जामखेड शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रलंबित कामांना चालना देऊन जामखेडकरांना या योजनांचा लवकरात लवकर लाभ कसा मिळेल यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्याच अनुषंगाने बुधवार दिनांक १८ मार्च रोजी सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रयत्नांतून सुरू झालेल्या या योजनेच्या कामाला गती देण्यासाठी जामखेड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा, उपाध्यक्ष, नगरसेवक व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी, ठेकेदार व नगरपरिषदेचे अधिकारी यांनी संयुक्त पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांकडून अडचणी समजावून घेतल्या तसेच यावर उपाययोजना करण्यासाठी त्यांना सूचनाही दिल्या. तसेच जामखेड नगर परिषदेच्या वतीने आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन जामखेड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा प्रांजल अमित चिंतामणी यांनी दिले. जामखेड शहरासाठी 'ड्रीम प्रोजेक्ट' मानल्या जाणाऱ्या या योजनेचे काम सध्या प्रगतीपथावर असून, एकूण ६६ किलोमीटरपैकी तब्बल ५५ किलोमीटर पाईपलाईनचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ११ किलोमीटर कामात काही शेतकरी, वनविभाग व अन्य तांत्रिक अडचणी येत असून, त्या सोडवण्यासाठी नगरपरिषद पुढाकार घेत आहे. "जामखेडकरांना २०२७ च्या दिवाळीपर्यंत उजनी धरणातून मुबलक व स्वच्छ शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. उर्वरित सर्व अडचणी लवकरात लवकर सोडवून ही योजना पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे असे नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी यांनी बोलताना सांगितले. यावेळी उपनगराध्यक्ष पोपट राळेभात, अमितभाऊ चिंतामणी, पाणीपुरवठा समिती सभापती श्रीराम डोके, नगरसेवक तात्याराम पोकळे, मनोज कुलकर्णी, संजय काशिद, प्रविण चोरडिया, मोहन वस्ताद पवार, पवनराजे राळेभात, प्रविण सानप, गणेश डोंगरे, संतोष गव्हाळे, सागर टकले, प्रविण होळकर, जया गव्हाळे, अशाबाई टकले, नंदाताई होळकर, सिमा कुलकर्णी, संग्राम पोले, मुख्याधिकारी अजय साळवे, पाणीपुरवठा अधिकारी ज्ञानेश्वर मिसाळ, प्राधिकरणाचे अधिकारी राजेंद्र चौधरी, अनिल चव्हाण तसेच ठेकेदार इगल इन्फ्राचे अनिल गुरूबक्सानी आदी उपस्थित होते.

## जाहीर समन्स

**गेवराई येथील श्री. एच. एम. मोमीन २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांच्या न्यायालयात..**

नियमित दिवाणी वाद क्र. ४४६ / २०२१

महेश वि. भानुदास व इतर

प्रति, प्रतिवादी क्र. ४..... सत्यभामा हरीभाऊ जाधव,

रा. धनगरवाडा, पैठण, ता. पैठण जि. औरंगाबाद.

ज्याअर्थी वादी यांनी दाव्याची प्रत सोबत जोडलेली नाही. यासाठी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक २१/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरीत्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्त्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तरे देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तरे देऊ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद सेट ऑफ्फ किंवा प्रतिवाद; काउंटर क्लेम ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या सेट ऑफ किंवा प्रतिवादाच्या काउंटर क्लेम पुष्ट्यर्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी. समन्स मिळाल्यापासून ३० दिवसांत लेखी कैफियत दाखल करावी. तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक १८/०३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिले.

आदेशावरून,

(सही/शिक्का) स. अधीक्षक,

दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

सूचना – १. तुमचे साक्षीदार स्वतः होऊन उपस्थित राहणार नाहीत अशी तुम्हाला धास्ती वाटत असेल तर न्यायालयाकडे अर्ज केल्यास व आवश्यक तो खर्च भरल्यास, कोणत्याही साक्षीदारास उपस्थित राहण्यास भाग पाडण्यासाठी व जो कोणताही दस्तऐवज हजर करण्यास साक्षीदारास सांगण्याचा तुम्हाला हक्क असेल तो दस्तऐवज हजर करण्यास भाग पाडण्यासाठी तुम्हाला या न्यायालयाकडून समन्स मिळू शकेल. २. वादीचे मागणे तुम्हाला मान्य असल्यास, हुकूमनाम्याची बजावणी टाळण्यासाठी तुम्ही वादाची रक्कम खर्चासह न्यायालयात भरावी. हुकूमनाम्याची बजावणी तुमच्यावर जातीने आली किंवा तुमच्या मालमत्तेवर किंवा या दोन्हीवर होऊ शकेल.

## "पुण्यश्लोक" या नावाने धावणार जामखेड आगाराची लाल परी

### पांडुरंग माने यांच्या मागणीला यश

जामखेड : (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व एस.टी. बसच्या दर्शन भागावर पुण्यश्लोक असे नामकरण व्हावे या बाबतची मागणी महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक सोहळा समितीचे महाराष्ट्र राज्य सदस्य पांडुरंग माने यांनी अहिल्यानगर जिल्ह्याचे विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांना निवेदनाद्वारे मागणी केली होती. अखेर त्यांच्या मागणीला यश आले असून जामखेड आगारातील बसला दर्शन भागावर पुण्यश्लोक असे नामकरण करण्यास सुरुवात झाली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव जामखेड तालुक्यातील चोंडी हे आहे. याच आनुशंगाने जामखेड तालुकाच नव्हे तर अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व एस.टी. बसच्या दर्शन भागावर पुण्यश्लोक असे नामकरण व्हावे या बाबतची मागणी महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक सोहळा समिती महाराष्ट्र राज्य सदस्य व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार उत्तर महाराष्ट्र मराठवाडा विभाग प्रमुख पांडुरंग माने यांनी अहिल्यानगर जिल्ह्याचे विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांना निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्या अनुषंगाने नुकतेच अहिल्यानगर जिल्ह्याचे विभाग नियंत्रक यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंतीच औचित्य साधत जामखेड आगार येथील सर्व एसटी बसवर पुण्यश्लोक नामकरणाला हिरवा कंदील दिला. अहिल्यानगर जिल्ह्याचे विभाग नियंत्रण राजेंद्र जगताप यांनी



याबाबत माहिती दिली. तसेच पांडुरंग माने यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ व्यवस्थापक डॉ. माधव कुसेकर, अहिल्यानगर विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप, जामखेड आगार व्यवस्थापक प्रमोद जगताप मनोज कुलथे व सर्व सहकारी यांचे आभार मानले. या बातमीने पांडुरंग माने महाराज यशवंतराव होळकर राज्याभिषेक सोहळा समिती महाराष्ट्र राज्य व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार विभाग प्रमुख यांचे तालुकाच नव्हे तर अहिल्यानगर जिल्ह्यात व महाराष्ट्रात सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी जामखेड आगार व्यवस्थापक प्रमोद जगताप, मनोज कुलथे, ओंकार दळवी, युवा नेते महेश मासाळ, उमेश भोगे, गणेश मासाळ, सचिन मासाळ वाहक चालक निलेश कचरे, साहेबराव डफळ, काशिनाथ तांबे, हनुमान आंधळे, जालिंदर सानप व इतर जामखेड आगार कर्मचारी उपस्थित होते. पांडुरंग माने यांनी अत्तापर्यंत आनेक सामाजिक कामे मार्गी लावली आहेत यामध्ये जामखेड आगारासाठी 20 बसची मागणी केली. चौंडी ते इंदोर पुण्यश्लोक एक्सप्रेस बसला मागणीनुसार यश संपादन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्तुत्ववान महिला सन्मान पुरस्कार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित. तसेच जामखेड आगार येथील सर्व एस.टी. बसवर दर्शनी भागावर पुण्यश्लोक नामकरण मागणीनुसार यश संपादन केले. अशा अनेक प्रश्नांची सोडवणूक पांडुरंग माने यांनी केली आहे.

# गहू, हरभरा यासह शेती पिकांचे नुकसान

**रोडगी, चाभरा, खैरगाव, सोनाळा, निमगाव परिसरात गारपीट तडाखा केळी सह पपईच्या,आंबाच्या बागा उध्वस्त**

**अर्धापूर: (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील अनेक भागात गुरुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास गारांसह अवकाळी पावसामुळे गहु, हरभरा,हळद, केळी,आंबे व फळबागा फुल शेतीसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावव नुकसान झाले आहे. हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार गारपिटीची शक्यता आहे, असा अंदाज वर्तविला होता.



तालुक्यात गारपीट व अवकाळी पावसाने शेतीला मोठा फटका बसला असुन तालुक्यातील काही गावात गारपीट झाली आहे. यांमध्ये रोडगी,निमगाव,चोभरा,खैरगाव, सोनाळाआदीसह अनेक गावांना गारपीट चा फटका बसला आहे. यामध्ये प्रामुख्याने वाळणीसाठी व शिजवणी सुरू असलेल्या हळद पिकाचे नुकसान झाले आहे. उभे असलेले,गहु, हरभरा,उन्हाळी ज्वारी, आंबा,भाजीपाला, फुलशेती आदीसह पिकाचे नुकसान झाले आहे. केळीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या भागातील केळी सह अनेक पिकांचे डोळ्यांसमोर नुकसान झाल्यामुळे शेतकरी हवालदील झाले आहेत. गारपीट व अवकाळी पावसामुळे पपई - केळीची पानेही फाटून गेली. या परिसरात मोठ्या प्रमाणात शेती पिकांचे नुकसान झाल्याची माहिती शेतकरी विठ्ठल काकडे यांनी दिली आहे.



ठाणे : दिवा शहरात पुणे जिल्हा रहिवासी संघ आयोजित गुढीपाडव्यानिमित्त शोभायात्रा आयोजित करण्यात आली होती. मराठी अस्मितेचा पहिला दिवस व सण म्हणजे गुढीपाडवा असून त्यानिमित्ताने दिवा शहरात भव्य शोभयात्रा मोठ्या थाटामाटात व आनंदात काढण्यात आली. प्रसंगी दिवा शहरात राहणारे पुणे जिल्हा रहिवासी मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते तर अनेक मान्यवर, बालगोपाल व महिलावर्ग सहभागी झाले होते. मराठी संस्कृतीची ओळख असणाऱ्या थोर पराक्रमी राजे व महापुरुषांच्या वेशभूषा परिधान करून शोभायात्रेत सहभागी झाले होते ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### मनपा नूतन पदाधिकारी व नगरसेवकांचा भाजपा व्यापारी आघाडीकडून सन्मान

अहिल्यानगर (स. गांवकरी) : भारतीय जनता पार्टी शहर व्यापारी आघाडी च्या वतीने मनपा नूतन भाजपा पदाधिकारी व नगरसेवकांचा सन्मान करून सत्कार करण्यात आला. यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, नगरसेवक निखिल वारे,महेश लोंढे,दत्ता गाडलकर, सुजय मोहिते,गोरख पडोळे,संजय ढोणे, भाजपा उपाध्यक्ष गोपाल वर्मा सह आदींचा सत्कार करण्यात आला. यावेळी व्यापारी आघाडीचे अध्यक्ष महेश गुगळे,हर्षल बोरा,नीरज राठोड,रुपेश वर्मा,सुरेश लालबागे,लक्ष्मीकांत तिवारी,संजय कांगडा, प्रशांत डहाळे,महेंद्र नांदुरकर,देवेंद्र दुधाळे हेमंत पवार,प्रशांत बुऱ्हाडे, अरुण पारेख,प्रकाश बोरा,विजय बोंद्रे ,राजेंद्र गांधी,संतोष भटेवरा,किरण राका,भाऊसाहेब पांढरे,धीरज पोखरणा,विजय गांधी,प्रवीण सुराणा,वेणुगोपाल झंवर आदी उपस्थित होते. यावेळी व्यापाऱ्यांच्या पाठीशी पक्ष कायम उभा आहे.त्यांचा समस्या लवकरच सोडवल्या जातील असे पदधिकाऱयांनी म्हटले आहे यावेळी अनेक मान्यवरांनी भाषणे झाली.

### नगर शहरात तरूणावर कोयत्याने हल्ला करत जिवे मारण्याची धमकी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर शहरातील लालटाकी परिसरात किरकोळ वादातून तरूणावर कोयत्याने हल्ला केल्याची घटना मंगळवार (दि.१७ मार्च) रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडली. योगेश दीपक कांबळे (वय-३२, रा. भारस्कर कॉलनी, लालटाकी) असे जखमी तरूणाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राजु मुरलीधर काळोखे (रा. भारस्कर कॉलनी, लालटाकी) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. योगेश कांबळे यांना मंगळवारी सायंकाळी त्यांच्या पुतणीने फोन करून राजू मुरलीधर काळोखे हा त्यांच्या घरी येऊन वहिनीला शिवीगाळ करत दमदाटी करत असल्याची माहिती दिली. ही माहिती मिळताच योगेश कांबळे हे कामाच्या ठिकाणाहून तातडीने घरी परतले. त्यावेळी संशयित आरोपी तेथून निघून गेल्याचे समजले. घटनेची विचारपूस करण्यासाठी ते संशयित आरोपीच्या घरी गेले असता, त्याने संतापून हातातील लोखंडी कोयत्याने त्यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे.या हल्ल्यातून बचाव करताना योगेश जखमी झाले आहेत. तसेच संशयित आरोपीने त्यांना व त्यांच्या भावाला शिवीगाळ करत मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. याशिवाय, त्यांच्या भावाची नोकरी घालवण्याची धमकीही संशयित आरोपीने दिली असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अंमलदार तन्वीर शेख करीत आहेत.



### ‘राज्यात अवकाळी पाऊस पडण्याचा अंदाज’; जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्यात गेल्या काही दिवसांपासून हवामानात मोठे बदल होताना दिसून येत आहेत. कुठे उष्णतेची लाट येत आहे तर कुठे अवकाळी पाऊस बरसत आहे. हवामान विभागाने २० मार्चपर्यंत राज्यात अवकाळी पाऊस पडण्याचा अंदाज यापूर्वी वर्तवला होता. आता आज (गुरूवार) अहिल्यानगरसह जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, राज्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस बरसणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला असून २१ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट तर ७ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, उत्तर कोकणातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ४० ते ५० किमी प्रति तास वेगाने वाहणारे सोसाट्याचे वारे वाहण्याची दाट शक्यता आहे. दक्षिण कोकण आणि गोवा भागातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी गारपीट, विजांच्या कडकडाटासह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ४० ते ५० किमी प्रति तास वेगाने वाहणारे सोसाट्याचे वारे वाहण्याची दाट शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी गारपीट, विजांच्या कडकडाटासह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ५० ते ६० किमी प्रति तास वेगाने वाहणारे सोसाट्याचे वारे वाहण्याची दाट शक्यता आहे. मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये आकाश प्रामुख्याने निरभ्र असेल. पहाटेच्या सुमारास हलक्या पावसाची शक्यता आहे.

## सृष्टीचा सृजनकर्ता ब्रह्मदेवाने गुढीपाडव्याला सृष्टीची निर्मिती केल्याने हा मुहूर्त चांगला - अशोकदादा जाधव महाराज

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

सृष्टीचा सृजनकर्ता करता असलेल्या ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती चैत्रप्रतिपदे पासून केली, हा दिवस साडेतीन मुहूर्तापैकी एक समजला जातो. आज श्री.स्वामी समर्थ यांना सहस्र कलश अभिषेक करण्याचा अमृतयोग लाभला हे माझे भाग्य समजतो.

गुढीपाडव्याच्या दिवशी सृष्टीची उत्पत्ती झाल्याने या दिवशी सूर्य, चंद्र व संपूर्ण राशीचक्र प्रारंभीच्या ठिकाणापासून भ्रमण सुरू करतात. भारतीय ज्योतिष शास्त्रानुसार गुढीपाडवा हा साडेतीन शुभ मुहूर्तापैकी एक आहे.असे निरूपण केडगाव येथील शंकर महाराज मठाचे अशोकदादा जाधव महाराज यांनी केले. सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिराचा २० वा वर्धापन दिन व



प्रकट दिना निमित्त गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अशोकदादा जाधव महाराज यांनी गुरुवारी सहस्र कलश अभिषेक केला. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाविकांना गुढीपाडव्याचे महत्त्व विशद करून भारतीय संस्कृतीमधील भक्तीयुक्त धारणेनुसार विजय व यशाचे सर्व श्रेय नेहमीच निसर्ग अथवा परमेश्वराला दिले जाते म्हणूनच यशासाठी परमेश्वराच्या प्रती लीन होऊन गुढी उभारण्याची प्रथा आहे असे त्यांनी सांगितले. गुरुवारी सकाळी श्री स्वामी समर्थ मूर्तीला जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर हवंना ची उदी, हळद, कुंकू एकत्र करून मूर्तीस स्नान घालण्यात आले.अकरा लिटर दुधात,सव्वा किलो साखर, एक किलो मध, एक किलो दही, एक किलो आम्रखंड, एक किलो गावरान तूप एकत्रित करून पुन्हा दुग्ध स्नान घालण्यात आले.

या अभिषेकानंतर सात किलो गुलाबांची फुले वापरून स्वामींना फुलांच्या पाकळ्यांमध्ये गुंफण्यात आले. गुलाबी रंगाच्या फुलात स्वामींची मूर्ती तेजोमय दिसत होती. हे आकर्षक रूप पाहण्यासाठी मंदिरात भाविकांनी गर्दी करून दर्शनाचा लाभ घेतला.

दुपारी नववर्षानिमित्त होमहवन करण्यात आले.यावेळी दश सहस्त्र ओम श्री स्वामी समर्थ नमो नमः या नामजपा मधे हवनाचा कार्यक्रम पार पडला.आरती होऊन प्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला.

## रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचा भव्य पादुका दर्शन सोहळा

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुकांचा भव्य दर्शन सोहळा शनिवार, दि. 21 मार्च 2026 रोजी श्रीगोंदा शहरातील बगाडे लँडमार्क (महाराजा कॉलेज शेजारी) येथे आयोजित करण्यात आला आहे. या पावन सोहळ्याला



अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील भाविकांनी सहकुटुंब उपस्थित राहून पादुकांचे दर्शन घ्यावे, असे आवाहन रामानंद संप्रदाय, दक्षिण अहिल्यानगर भक्त सेवा मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी 10 वाजता जगद्गुरुंच्या सिद्ध पादुकांची श्रीगोंदा शहरातून भव्य मिरवणूक काढून होणार आहे. त्यानंतर पादुका कार्यक्रमस्थळी संतपीठावर विराजमान होतील. पुढे गुरुपूजन, आरती, प्रवचन, उपासक दीक्षा, बाल उपासक दीक्षा, दर्शन तसेच पुष्पवृष्टी असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने सातत्याने लोककल्याणकारी उपक्रम राबविले जातात. यात गोरगरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण व शैक्षणिक साहित्य वाटप, महाराष्ट्रभर 53 मोफत ॲम्बुलन्स सेवा, श्रीक्षेत्र नाणीजधाम येथे 24 तास रुग्णालय सेवा यांचा समावेश आहे. तसेच शेतकऱ्यांना मोफत बियाणे, खते, औषधे व शेती अवजारे दिली जातात.

## संजय वाकचौरे यांचा पुरस्काराने गौरव



**गणोरे : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील पिंपळगाव निपाणी येथील कृषी तज्ञ संजय देविदास वाकचौरे झिरो खर्चात गणोरे डोंगरगाव व पिंपळगाव निपाणी परिसरातील त्यांच्या शेती मध्ये गेल्या अनेक वर्षापासून रासायनिक खते न वापरता उत्कृष्टपणे सेंद्रिय शेतीचे काम सुरू असून त्यांनी आपली शेती पूर्ण झिरो बजेट ऑरगॅनिक शेती केली तयार केली आहे. याची दखल घेऊन भारत सरकार ऑरगॅनिक फार्मिंग केंद्र शासनाच्या वतीने त्यांनी त्यांना बेस्ट फार्मर आवार्ड पुरस्कार देऊन नुकतेच गौरवण्यात आले. कृषी किसान कल्याण मंत्रालयाच्या मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. गांडूळ खत, शेणखत, कोंबडी खत, बकरीच्या लेंडी, गावठी गोमूत्र ही रासायनिक खता पेक्षाही स्वस्त असतात याचाच वापर ते आपल्या शेतीमध्ये करत आहे. यावेळी डॉ. गगनेश शर्मा संचालक गाजियाबाद, डॉ. स्वप्रिल मगर - कनिष्ठ वैज्ञानिक,डॉक्टर एस एस देशमुख कृषी विज्ञान चे वरिष्ठ वैज्ञानिकों, डॉ. एस एस सोनवणे शास्त्रज्ञ, के व्ही के बाळेश्वर आदी उपस्थित होते.



## पुण्यात “राष्ट्रीय गौरव पुरस्कार सोहळा २०२६” उत्साहात

**कर्तृत्ववान शेतकरी व समाजसेवकांचा सन्मान**

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनतर्फे आयोजित “राष्ट्रीय गौरव पुरस्कार सोहळा 2026” पुण्यात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कृषी क्षेत्र, समाजकार्य, ग्रामीण विकास आणि शेतीसंबंधित विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना यावेळी सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून सिने अभिनेत्री नेहा पटिले आणि अपूर्वा परदेशी उपस्थित राहिल्या. त्यांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याला विशेष आकर्षण प्राप्त झाले. संस्थेचे अध्यक्ष गणेश रामदास विटकर यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

यावेळी स्वप्रिल पवार (वन वे इंटरटेनमेंट), कृषी अधिकारी एस. एस. सावंत यांच्यासह अनेक उद्योजक, कृषी तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून सेंद्रिय शेती, शाश्वत शेती पद्धती, जलसंधारण, पशुपालन, महिलांचे सक्षमीकरण आणि कृषी उद्योजकता या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना “राष्ट्रीय गौरव पुरस्कार 2026” प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना अध्यक्ष गणेश विटकर म्हणाले, “महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकरी हा आपल्या देशाचा खरा हिरो आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळे समाजाची प्रगती आणि अन्नसुरक्षा शक्य झाली आहे. शेतकऱ्यांचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्य आणि अभिमान आहे.” या कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांसाठी मोफत मार्गदर्शन शिबिरे, कृषी उद्योजकतेसाठी प्रशिक्षण कार्यशाळा, विद्यार्थ्यांसाठी ॲग्री-इनोव्हेशन स्पर्धा तसेच राज्यभर “शेती प्रेरणा अभियान” राबवण्याची घोषणाही करण्यात आली.

एकूणच हा सोहळा केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित न राहता कृषी क्षेत्राला नवी दिशा देणारा आणि शेतकऱ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

## शिवराज पाटील होटाळकर यांना ‘महाराष्ट्र भूषण सन्मान २०२५’प्रदान

**नायगाव: (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील व ग्रामीण शिक्षण, सामाजिक कार्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल नांदेड जिल्ह्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील पवार होटाळकर यांना प्रतिष्ठेचा ‘महाराष्ट्र भूषण सन्मान २०२५’ प्रदान करण्यात आला. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे १५ मार्च रोजी पार पडलेल्या राज्यस्तरीय भव्य सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे कौशल्य विकास व उद्योजकता तसेच उद्योग मंत्री नामदार मंगलप्रसाद लोढा यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह, संदीप



काळे लिखित पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. जगातील ७८ देशांत कार्यरत असलेल्या ‘व्हॉईस ऑफ मीडिया’, ‘व्हीओएम इंटरनॅशनल फोरम’ आणि आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र शासन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण सन्मान प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुष्यमान भारत मिशनचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे होते. यावेळी पोलिस आयुक्त मुंबई महेश पाटील,कल्याणकर सेवा निवृत्त सनदी अधिकारी,सामाजिक कार्यकर्ते राणा सूर्यवंशी, चंद्रमोहन पोपाला, रविकांत तुपकर,जिल्हाधिकारी अशोक काकडे,पुढारी चॅनल चे प्रसन्न जोशी, जय महाराष्ट्रचे प्रसाद काथे,लोकशाही चॅनल विशाल पाटील, व्हीओ एम राष्ट्रीय अध्यक्ष अनिल मस्के, व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.प्रास्ताविक राष्ट्रीय अध्यक्ष अनिल मस्के यांनी तर आभार विजय चोरडिया,संचलन आणि नियोजन संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी केले ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिवराज पाटील होटाळकर यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. शिक्षण, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्यामुळे अनेक ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या असून ग्रामीण भागात सकारात्मक परिवर्तन घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. शिक्षण सभापती म्हणून कार्यरत असताना त्यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी श्रीकर परदेशी यांच्या सहकार्याने जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. राजकीय क्षेत्रात सक्रिय असतानाही समाजकारणाची धुरा समर्थपणे सांभाळत ग्रामीण विकासासाठी त्यांनी केलेले कार्य विशेष ठरले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना ‘महाराष्ट्र भूषण सन्मान २०२५’ प्रदान करण्यात आला. यंदाच्या पुरस्काराचे मानकरी म्हणून अशोक काकडे-देशमुख (जिल्हाधिकारी, सांगली), सत्यपाल महाराज (राष्ट्रीय प्रबोधनकार, कीर्तनकार), सारडा कचरू हिरालाल (समाजसेवक), शिवराज पाटील पवार होटाळकर (ग्रामीण शैक्षणिक कार्य, नांदेड) आणि प्रा. डॉ. सविता गिरे पाटील (ग्रामीण मुलींच्या शिक्षणासाठी कार्य) यांचा गौरव करण्यात आला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)